महाराष्ट्र शासन
उपसंचालक , कोयना वन्यजीव विभाग , सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड यांचे कार्यालय
सह्याद्री भवन. त्रिमर्ती कॉलनी. आगाशिवनगर
पो. मलकापुरता. कराड, जि. सातारा - ४१५५३९
१६४२४१७११ :
executivedirectortcfstr@gmail.com

क्रमांक: जा. क्र.अ./प्रतिष्ठान/कंत्राटीकर्मचारी/ /२०२४-२५ कराड, दिनांक : .०३.२०२६

# कंत्राटी तत्वावर पदे भरण्याकरीता जाहिरात

सह्याद्री व्याघ्र राखीव संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर यांचे अधिनस्त ११ महिन्यांच्या करारावर कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे पदे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | मानधन | पात्रता | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पशुवैद्यकीय तांत्रिक सल्लागार अधिकारी (अर्धवेळ) [Veterinary Technical Consultant Officer] | ०१ | ३०,०००.०० | १) पशुवैद्यकशास्त्र पदवी / पदव्युत्तर (B.V.Sc./ M.V.Sc.)<br>२) वन्यजीव क्षेत्रात किमान ०३ वर्षे कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>३) पदव्युत्तर असल्यास प्राधान्य. | १. वन्यजीवांना पशुवैद्यकीय सेवा पुरवणे.<br>२. मृत वन्यजीवांचे शवविच्छेदन करणे.<br>३. वन्यजीवांचा बचाव, पुनर्वसन कामे करणे.<br>४. व्याघ्र प्रकल्पाच्या झालरक्षेत्रात लसीकरण मोहिम राबवणे.<br>५. भक्ष व वाघाचे स्थानांतरणा बाबतची कामे.<br>६. वन्य प्राण्याच्या रोगाबाबत संशोधन सर्वेक्षण व प्रशिक्षण.<br>७. क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण<br>८. वन्यजीव विषयी इतर सर्व अनुषांगिक कामे. |
| ०२ | स्थापत्य अभियंता (Civil Engineer) | ०२ | ३०,०००.०० | १) स्थापत्यशास्त्र पदवी<br>२) SIS (Standared InfoSystems) Estimate and Tender Master, Auto CAD/ MS-CIT Revit सॉफ्टवेअरचे ज्ञान असणे आवश्यक<br>३) स्थापत्य कामांचा ३ वर्षांचा अनुभव<br>वन व वन्यजीव विभागातील अनुभव असल्यास प्राधान्य | १.स्थापत्य कामांचे रेखाचित्र व अंदाजपत्रके तयार करणे<br>२.व्याघ्र प्रकल्पातील स्थापत्य कामांची देखरेख करणे व स्थापत्य कामांचा दर्जा राखणे<br>३.अंदाजपत्रकानुसार स्थापत्य कामाची अंमलबजावणी करणे<br>४.स्थापत्य कामांची देखरेख करणे, मोजमापे घेऊन मोजमाप पुस्तिकेत नोंद घेणे.<br>५.स्थापत्य कामांचे अहवाल सादर करणे, देयके तपासणे इत्यादी.<br>६.स्थळपाहणी करून आवश्यक स्थापत्य / जल व मृद्संधारण कामे सुचविणे इत्यादी.<br>७. या विषयी इतर सर्व अनुषांगिक कामे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | **निसर्ग संवादक तज्ञ (Nature Extension Officer)** | ०१ | ३०,०००.०० | १) कोणत्याही शाखेतील पदवीधर किंवा वन व वन्यजीव क्षेत्रात किमान ३ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>२) मराठी,हिंदी व इंग्रजीमध्ये चांगले संवाद कौशल्य आवश्यक<br>३) निसर्ग, पर्यावरण,वन व वन्यजीवाबाबत मुलभूत ज्ञान आवश्यक<br>४) कामाचे ठिकाण हे सह्याद्री व्याघ्र राखीव असेल. क्षेत्रीय दौर्यादरम्यान मुक्कामी राहण्याची तयारी आवश्यक | १.शाळा महाविद्यालय भेटी देऊन निसर्ग, वन व वन्यजीवाबाबत मुलभुत ज्ञन देणे.<br>२.व्याघ्र संरक्षण,संवर्धनाबाबत जनजागृती करणे<br>३.शाळा,महाविद्यालयाचे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात कॅम्प आयोजित करणे<br>४.व्याघ्र प्रकल्पाचे सर्व सहभागीदार यांचेबरोबर सौहार्धाचे संबंध प्रस्थापित करणे<br>५.ग्रामपंचायत स्तरावर सभा घेऊन व्याघ्र प्रकल्पाबद्दल जनजागृती करणे<br>६.सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील उल्लेखनीय कामांची वृत्तपत्रे,रेदिओ, दूरचित्रवाणी मार्फत प्रचार व प्रसिध्दी करणे<br>७.सह्याद्री वार्ता त्रैमासिक साठी माहितीचे संकलन करणे<br>८.इको गाईड यांना प्रशिक्षित / मार्गदर्शन करणे<br>९.या विषयी सर्व अनुषंगिक कामे<br>१०. सह्याद्री व्याघ्र राखीवमध्ये विविध दिन साजरे करणे. |
| ०४ | भौगोलिक माहितीप्रणाली तज्ञ (GIS Expert) | ०१ | ३३,०००.०० | १)विज्ञान / अभियांत्रिकी / भूगोल या शाखेतील पदवी<br>२)रिमोट सेन्सिंग, जीआयएस पदवी/ पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी<br>२)वन व वन्यजीव क्षेत्रातील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव व Erdass Imagine, Arc GIS,QGIS, Grass या सॉफ्टवेअरचे ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य | १.रिमोट सेन्सिंग,जी.आय.एस.गुगल अर्थ संगणकीय प्रणालीवर करावयाची सर्व कामे.<br>२.वन संसाधन मुल्यांकन व देखरेख, वन संरक्षण, वन्यजीव व्यवस्थापन, वनसंवर्धन व जैवविविधता मुल्यांकन, पाणलोट क्षेत्र संवर्धन, मृद व जलसंधारण.<br>३.विविध नकाशे तयार करणे,<br>४.घडीपुस्तिका, पुस्तके, अहवाल,मासिके,त्रैमासिके डिझाईन करणे.<br>५.Erdass Imagine, Arc GIS, Q GIS, Grass, जीओमेडीया इत्यादी कार्यप्रणाली हाताळणे.<br>६.KML, Shape file तयार करणे, हाताळणे.<br>७.MSTrIPES मासिक अहवाल तयार करणे.<br>८.AITE data analysis & reporting<br>९.या विषयी सर्व अनुषंगिक कामे.<br>१०. NTCA मार्फत वेळोवेळी सुचविण्यात आलेली कामे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | **संगणक मदतनीस** **[Office Assistant Cum Graphic designer Cum Computure Operator]** | **०४** | १७,०००.०० | १) कोणत्याही शाखेतील पदवीधर<br>२) मराठी, इंग्रजीतून पत्रव्यवहाराचे ज्ञान आवश्यक<br>३) टंकलेखन मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि.<br>३) एम.एस.सी.आय.टी.<br>४) Coral draw व फोटोशॉप बाबत ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य<br>५) शासकीय कार्यालयात विशेषकरून लेखाविषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. | १. व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत विविध प्रकाशनांचे डिझायनिंग करणे.<br>२. पत्रव्यवहार, ई-मेल , फाईलिंग, नोट्स, इतिवृत्त, अहवाल, टिपण्या यांचे काम पाहणे.<br>३. शासन निर्णय, अध्यादेश, अभिलेख पहाणे, संग्रह ठेवणे.<br>४. अधिकाऱ्यांचे महत्वाचे दौरे, बैठका यांबाबत अवगत करणे.<br>५. महत्वाचे, निकडीचे, प्रलंबीत विषय संबंधीतांच्या नजरेस आणून देणे.<br>६. व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी तातडीची असलेली कोणत्याही स्वरूपाची अनुषंगिक कामे करणे. |

( किरण जगताप )
सदस्य सचिव-१
सह्याद्री व्याघ्र राखीव संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर
तथा उपसंचालक
कोयना वन्यजीव विभाग
सह्याद्री व्याघ्र राखीव , कराड

अर्ज सादर करण्याचा कालावधी :

दिनांक : ०७.०४.२०२६ सायंकाळी १७.०० वाजे पर्यंत ( शासकीय सुट्टीचे दिवस वगळून ) खालील पत्त्यावर लिखीत स्वरूपात अर्ज सादर करावेत. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाबाबत योग्यत्या कागदपत्रांची स्वयंसाक्षांकीत सत्य प्रती जोडाव्यात. तसेच अर्जाची छानणी करून दिनांक १३.०४.२०२६ पासून (शक्य झाल्यास) मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी कळविले जाईल. मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहण्याची जबाबदारी पात्र उमेदवाराची राहील. नमूद दिनांक व वेळेत उपस्थित नराहणाऱ्या उमेदवाराचा विचार निवड प्रक्रियेत केला जाणार नाही. मुलाखतीच्यावेळी सर्व मूळ कागदपत्रांसह हजर रहावे.

अर्ज सादर करण्याचा पत्ता:

उपसंचालक (कोयना), सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड यांचे कार्यालय "सह्याद्रीभवन", त्रिमुर्ती कॅालनी, आगाशिवनगर पो. मलकापुर, ता. कराड, जि. सातारा - ४१५५३९ईमेल : executivedirectortcfstr@gmail.com

वयोमर्यादा : २१ ते ३५ वर्षे

अटी व शर्थी :

1. वरील पदांसाठी संगणक ज्ञान व टंकलेखन कौशल्य आवश्यक आहे.
2. वरील पदांसाठी मराठी व इंग्रजी मधून पत्रव्यवहार करता येणे आवश्यक आहे.
3. निम्नस्वाक्षरीकर्ता यांचे प्रशासकीय अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी नेमून दिलेली नेहमीची कामे तसेच ईतर खास कामे करणे तसेच वरील सर्व पदांवर निवड झालेल्या व्यक्तींना सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे कार्यकक्षेत काम करणे बंधनकारक राहील. जर कामामध्ये दिरंगाई अथवा टाळाटाळ झाल्यास सदरचे करार रद्द करणेचे अधिकार क्षेत्रसंचालक सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांना असतील.
4. कंत्राटी कर्मचारी यांना कंत्राटी तत्वावर महिना पुर्ण झाल्यावर मानधन अदा करणेत येईल.
5. वरील सर्व पदे आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करणेचा अधिकार अध्यक्ष कार्यकारी समिती, सह्याद्री व्याघ्र राखीव संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे.
6. निवड करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहित नमुन्यात ₹ ५०० चे स्टँपपेपरवर बंधपत्र सादर करावे लागेल.
7. कर्मचाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे शासनास आर्थिक नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई कर्मचाऱ्याकडून वसूल करून घेतली जाईल.
8. कराराची ११ महिन्यांची मुदत संपलेनंतर क्षेत्रसंचालक यांचे कामाबाबत समाधान झाले असल्यास व उमेदवार ईच्छुक असल्यास करार वाढवण्यात येऊ शकेल.
9. कंत्राटी कर्मचारी हा शासनाच्या कायम सेवेत राहण्यासाठी हक्काचा कोणताही दावा करू शकणार नाही.
10. निम्नस्वाक्षरी कर्ता यांना कंत्राटी कर्मचाऱ्याला ११ महिने पुर्ण होण्याच्याआधी कारण न देता व कोणतेही पुर्व नोटीस न देता कामावरून काढून टाकणे व त्याचे कंत्राट रद्द करण्याचे अधिकार क्षेत्रसंचालक यांना असतील.
11. कर्मचाऱ्याला ११ महिने पुर्ण होण्याआधी काम सोडावयाचे असल्यास त्याने एक महिना आगोदर लिखित नोटीस देऊन कंत्राट रद्द करण्याची मुभा असेल.
12. कर्मचाऱ्याच्या अखत्यारीत असलेले शासकीय दस्तऐवज, नस्ती, पत्रव्यवहार यांची गोपनीयता पाळणे बंधनकारक असेल. तसेच सदर शासकीय माहितीचा दुरूपयोग केल्यास त्यास संबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरून प्रचलित नियम व कायद्यानुसार कारवाई केली जाईल.
13. कामाचे तास हे कार्यालयीन कामाच्या गरजेनुसार वेळोवेळी राहतील.
14. अर्जदार गुन्हेगारी प्रवृत्तीचा किंवा पार्श्वभूमीचा नसावा. तसे आढळून आल्यास सदर अर्जदारास तात्काळ कामावरून कमी करण्यात येईल.
15. बंधपत्र संपल्यानंतर कर्मचाऱ्याच्या अखत्यारीत दिलेले शासकीय दस्तऐवज, कागदपत्रे, पुस्तके व ईतर सर्व प्रकारचे शासकीय साहित्य व दस्तऐवज कार्यालयात जमा करावे. दस्तऐवजाच्या कोणत्याही प्रती कोणत्याही स्वरूपात सोबत नेऊ नये, अथवा त्याचा गैरवापर करता येणार नाही. तसे आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
16. सदरचे पद ही महाराष्ट्र शासनाची निर्मित पद नाही. सदर पदावर निवड केल्यास कोणताही अनुभवाचा दाखला, पदावर हक्क अथवा निर्माण होणाऱ्या शासकीय वा प्रतिष्ठानच्या पदावर हक्क सांगता येणार नाही.
17. प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी प्रात्र अर्जदारास अलाहिदा तारीख, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल.
18. गुणवत्तेच्या आधारावर समान गुण मिळाल्यास बफर क्षेत्रातील उमेदवाराच्या प्राधान्याने विचार केला जाईल.
19. आपणास अपेक्षित मानधनाबाबत आपल्या अर्जामध्ये उल्लेख करावा.

(किरण जगताप)
सदस्य सचिव-१
सह्याद्री व्याघ्र राखीव संवर्धन प्रतिष्ठान, कोल्हापूर
तथा उपसंचालक
कोयना वन्यजीव विभाग
सह्याद्री व्याघ्र राखीव , कराड

# अर्जाचा नमुना

पासपोर्ट
आकाराचा
रंगीत फोटो

प्रति,
सदस्य सचिव,
सह्याद्री व्याघ्र राखीव संवर्धन प्रतिष्ठान,
कोल्हापूर.

विषय : ........................................ या पदासाठी अर्ज.

संदर्भ : ........................................ मधील जाहिरात.

महोदय,
मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलवार जाहिरात वाचली असून, माझा वैयक्तीक तपशील खालीलप्रमाणे आहे.

१संपूर्णनाव : ........................................
........................................

२.जन्मतारीख : ........................................

३.संपुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, व ईमेल : ........................................
........................................

४.शैक्षणिक पात्रता : ........................................

५.अनुभव : ........................................

६.वेतनाची किमान अपेक्षा :

अर्जदाराचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी

ठिकाण :
दिनांक :